तरुण भारत
# सदाफुली
बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०२४

आतील पानावर
पान २ – ऐश्वर्या आणि अभिषेक करणार एकत्र काम?
पान ३ – 'हिना खान'चं लवकरच कमबॅक
पान ४ – राम चरण–कियारा अडवाणीच्या 'गेम …
पान ५– सुयश टिळकची नव्या वेबसीरिजमध्ये …
पान ६ – मी प्रामाणीक असल्याने राजकारणात…

# 'हा' अभिनेता बनला भारतातील सर्वात लोकप्रिय स्टार!



अभिनेता प्रभास हा कायमच चर्चेत असतो. प्रभासची सोशल मीडियावर जबरदस्त अशी फॅन फॉलोइंग बघायला मिळते. प्रभासचे एका मागून एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येताना दिसत आहेत. आता 'कल्की २८९८ एडी' च्या यशानंतर प्रभास हा शाहरुख खान, सलमान खान आणि अल्लू अर्जुन सारख्या आयकॉनला मागे टाकून भारतातील सर्वात लोकप्रिय स्टार बनला आहे. जीरु ने त्यांची 'Ormé Star India Lover: Mort Prlar Male Film Starr in India ' यादी जाहीर केली, ज्यामध्ये प्रभासला अव्वल स्थान मिळाले. अभिनेता विजयने दुसरा क्रमांक पटकावला आहे. तर शाहरुख खानने या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे.ज्युनियर एनटीआर आणि अजित कुमार चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहेत. तर अर्जुन या यादीत सहाव्या क्रमांकावर आहे. महेश बाबू सातव्या, सूर्य आठव्या आणि राम चरण नवव्या स्थानावर आहेत. २०२३ मध्ये 'टायगर ३' नंतर एकही सिनेमा रिलीज न झालेला सलमान खान हा टॉप १० मध्ये दहाव्या स्थानावर आहे. ही यादी शेअर करण्यात आली असून चाहत्यांनीही त्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. प्रभासला पहिल्या क्रमांकावर पाहून त्याचे चाहते खूश झाले आहेत. प्रभासचा 'कल्की २८९८ एडी' हा २०२४ मध्ये सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट आहे. प्रभास, अमिताभ बच्चन व दीपिका पादुकोण यांच्या मुख्य भूमिका असलेला 'कल्की २८९८ एडी' हा चित्रपट २७ जून रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. तब्बल १,२०० कोटींची कमाई करत हा चित्रपट सर्वाधिक बॉक्स ऑफिस कलेक्शन करणारा भारतीय सिनेमा ठरला.

# अक्षयच्या 'या' सिनेमाचा येणार सिक्वेल

सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता सुभाष घई यांनी २००४ मध्ये प्रदर्शित झालेला हिट चित्रपट 'ऐतराज'च्या सिक्वेलची घोषणा केली आहे. या चित्रपटाचे नाव 'ऐतराज २' असणार आहे. 'ऐतराज'ला २० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सुभाष घई यांनी या चित्रपटाची घोषणा केली. 'ऐतराज' हा रोमँटिक थ्रिलर चित्रपट होता, ज्यामध्ये अक्षय कुमार, प्रियांका चोप्रा आणि करीना कपूर यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या.

अब्बास-मस्तान यांच्या जोडीने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. सुभाष घई यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून पोस्ट करत माहिती दिली की, 'ऐतराज २'ची कथा पूर्णपणे तयार आहे. त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले, आता मुक्ता आर्ट्स 'ऐतराज २'साठी पूर्णतः तयार आहे. तीन वर्षांच्या मेहनतीनंतर या उत्कृष्ट पटकथेची निर्मिती केली आहे. जस्ट वेट अँड वॉच, असे त्यांनी आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये लिहिले आहे. घई यांनी आपल्या पोस्टमध्ये अभिनेत्री प्रियांका चोप्राच्या 'ऐतराज'मधील सोनियाच्या भूमिकेच्या आठवणी सांगितल्या. प्रियांका ही भूमिका करण्यासाठी सुरुवातीला संकोच करत होती. सुभाष घई पुढे म्हणाले, प्रियांका चोप्राने तिच्या अभिनयातून धाडस आणि सुंदरतेचे दर्शन घडवले. त्या पात्रातील तिची अदाकारी आज २० वर्षांनंतरही प्रेक्षकांच्या लक्षात आहे.

या चित्रपटात अमरीश पुरी, अन्नू कपूर, परेश रावल, उपासना सिंग आणि विवेक शौक यांनीदेखील महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या होत्या. या सिनेमात प्रियांकाने खलनायिकेचे पात्र साकारले होते. या चित्रपटामुळे तिला बॉलीवूडमध्ये खरी ओळख मिळाली होती, असे बोलले जाते.






# ऐश्वर्या आणि अभिषेक करणार एकत्र काम?

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन हे बॉलीवूड मधील एक ग्लॅमरस दांपत्य आहे. त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. मात्र सध्या त्यांच्या चित्रपट कारकिर्दी विषयी तसेच वैयक्तिक जीवनाविषयी सतत वेगवेगळी चर्चा सुरू असते. दोघांचे लग्न एप्रिल २००७ मध्ये झाले आणि त्यांना आराध्या नावाची कन्या झाली. सध्या ते दोघे वेगळे राहत असल्याच्या चर्चांना सोशल मीडियावर उधाण आले आहे. दोघांच्या रिलेशनशिप विषयी विविध अफवा सुरू आहेत. परंतु तरी सुद्धा दोघेही एकत्रितपणे मणीरत्नम यांच्या दिग्दर्शना खालील प्रोजेक्टमध्ये एकत्रित काम करताना दिसणार आहेत. याआधी हे दोघे 'गुरु' चित्रपटात एकत्र दिसले होते. त्यानंतर २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या रावन चित्रपटातही दोघे एकत्र दिसले होते. त्या दोघांची ऑन स्क्रीन केमिस्ट्री आणि मनीरत्नम यांचे दिग्दर्शिय कौशल्य यामुळे या संभाव्य कलाकृती विषयी चाहत्यांच्या मनामध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून मनिरत्नम काय जादुई कलाकृती निर्माण करणार आहेत. याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले आहे. मनिरत्नन हे भारतातील प्रख्यात असे दिग्दर्शक आहेत. अभिषेकने पहिल्यांदा मनिरत्नम यांच्या बरोबर २००४ मध्ये 'युवा' चित्रपटासाठी काम केले होते. अमुक कार्यक्रमात फक्त दोघांपैकी एक जण उपस्थित होता किंवा कुठल्या कार्यक्रमाला तो दोघे वेगवेगळ्या वेळी आले याची चर्चा होताना दिसते. त्यातच अभिषेकने इंस्टाग्रामवर ग्रे डायव्होसस मथळ्याखाली पोस्ट टाकल्यामुळे अफवांचा बाजार वाढला होता. मणिरत्नम यांचा संभाव्य प्रकल्प पुढे गेला आणि पूर्ण झाला तर मणिरत्नमच्या चाहत्यांखेरीज अभिषेक ऐश्वर्याच्या चाहत्यांना देखील ट्रीट ठरणार आहे. त्याखेरीज त्यातून अभिषेक आणि ऐश्वर्या यांच्यातील नाते घट्ट असल्याचे अधोरेखित होणार आहे. अद्याप या चित्रपटाची कथा उघड झालेली नाही.

# जुही बॉलीवूडमधील सर्वांत श्रीमंत अभिनेत्री



अभिनेत्री जुही चावला ही तिच्या अभिनयासाठी, उत्तमोत्तम चित्रपटांसाठी ओळखली जाते. अभिनयाशिवाय तिची यशस्वी उद्योजिका म्हणूनदेखील ओळख आहे. काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या हुरून रिच लिस्टनुसार जुही भारतातील सर्वांत श्रीमंत अभिनेत्री ठरल्याचे पाहायला मिळाले. जगभरातील टॉप १० श्रीमंत कलाकारांमध्ये ज्या अभिनेत्रीचे नाव आहे, ती जुही चावला आहे. जुहीची ४,६०० कोटी रुपयांची संपत्ती आहे, जी ऐश्वर्या राय बच्चन, प्रियांका चोप्रा, आलिया भट्ट, दीपिका पदुकोण या अभिनेत्रींपेक्षा अनेक पटींनी जास्त आहे. २००९ पासून जूहीचा एकही चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरलेला नाही. अभिनेता शाहरुख खानबरोबर भागीदार आहे. जुही चावलाला चित्रपटांचे मानधन मिळते. मात्र, तिच्या संपत्तीत महत्त्वाचा वाटा हा तिच्या व्यवसायाचा आहे. ती शाहरुखच्या रेड चिलीज ग्रुपची भागीदार आहे. त्याबरोबरच ती अनेक क्रिकेट संघांची मालकीण आहे आणि त्यामध्ये कोलकाता नाईट राइडर्सचादेखील समावेश आहे. ही टीम २००७ ला शाहरुख, जुही चावला व तिचा पती जय मेहता यांनी ७५.०९ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच ६२३ कोटी रुपयांना विकत घेतली होती. फोर्ब्सने दिलेल्या माहितीनुसार, सध्या या टीमची किंमत १.१ बिलियन डॉलर्स म्हणजे ९,१३९ कोटी रुपये इतकी आहे. याआधी जुही चावला आणि शाहरुख खानने २००१ साली ड्रीम्ज अनलिमिटेड ही प्रॉडक्शन कंपनी सुरू केली होती. या प्रॉडक्शनअंतर्गत त्यांनी तीन चित्रपटदेखील प्रदर्शित केले; मात्र त्यांच्यातील मतभेदांमुळे ते वेगळे झाले. या सगळ्याबरोबर जुही चावला सौराष्ट्र सिमेंट लिमिटेड या कंपनीत भागीदार आहे. ही कंपनी तिचा पती जय मेहता यांची आहे. या जोडप्याचे दोन रेस्टॉरंट्सदेखील आहेत. जुही चावला तिच्या पतीबरोबर रिअल इस्टेटमध्येदेखील गुंतवणूक करीत असते. दरम्यान, अभिनेत्री मॅगी, पेप्सी, कुरकुरे, अशोक लोणचे, केशकिंग आयुर्वेदिक तेल, इमामी बोरोप्लस अशा अनेक उत्पादनांची ती ब्रॅण्ड ॲम्बेसॅडर आहे. त्याबरोबरच जुही चावला 'झलक दिख ला जा' या शोची परीक्षकदेखील होती.

# सोनाक्षी माझ्यासारखी दिसते हा योगायोग

बॉलीवूडमधील काही अभिनेत्री सारख्याच दिसतात, असं तुम्ही ऐकलं असेल. झरीन खान कतरिना कैफसारखी दिसते, तर स्नेहा उल्लाल ही ऐश्वर्या रायसारखी दिसते; अशी सोशल मीडियावर खूपदा चर्चा होते. सोनाक्षी सिन्हा ही ज्येष्ठ अभिनेत्री रीना रॉय यांच्यासारखी दिसते, असं खूपदा म्हटलं जातं. एकदा रीना यांनी स्वतःच यावर प्रतिक्रिया दिली होती. रीना रॉय या बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहेत. त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केलं आहे. सत्तर आणि ऐंशीच्या दशकात त्यांनी प्रेक्षकांचं खूप मनोरंजन केलं. रीना रॉय त्यांच्या चित्रपटांबरोबरच लव्ह लाईफमुळेही त्याकाळी खूप चर्चेत राहिल्या होती. त्यांच्या व शत्रुघ्न सिन्हा यांच्या नात्याची खूप चर्चा झाली होती. दोघांचं अफेअर होतं मात्र, काही काळानंतर त्यांच्या नात्यात दुरावा आला. दोघांचं नातं अत्यंत वाईट पद्धतीने संपलं होतं. शत्रुघ्न हे विवाहित होते आणि त्यांना पत्नीला सोडायचं नव्हतं. शत्रुघ्न सिन्हा यांच्या पत्नीचं नाव पूनम सिन्हा असून त्यांना लव्ह आणि कुश ही दोन मुलं व सोनाक्षी ही मुलगी आहे. शत्रुघ्न सिन्हा यांच्याबरोबरचं नातं संपल्यावर रीना रॉय यांनी पाकिस्तानी क्रिकेटर मोहसिन खानशी लग्न केलं होतं. दोघेही आपापल्या आयुष्यात पुढे गेले. मात्र सोनाक्षी सिन्हा ही रीना रॉय यांच्यासारखी दिसते, असं अनेकदा म्हटलं जातं. सोनाक्षी दिसायला हुबेहुब रीना यांच्यासारखी दिसते, याबाबत एकदा खुद्द रीना रॉय यांना विचारण्यात आलं होतं. सोनाक्षी माझ्यासारखी दिसते, हा निव्वळ योगायोग आहे, कधी कधी असं घडतं. अभिनेत्री जितेंद्र यांची आई आणि माझी आई सारख्याच दिसत असल्याने त्यांनाही जुळ्या बहिणी म्हटलं जायचं, असं रीना एका मुलाखतीत म्हणाल्या होत्या. दरम्यान, रीना रॉय यां पाकिस्तानी क्रिकेटर मोहसिन खानबरोबरचं लग्न फार काळ टिकलं नव्हतं. त्यांना एक मुलगी असून तिचं नाव समन खान आहे. तर, शत्रुघ्न सिन्हा यांची एकुलती एक मुलगी सोनाक्षी हिने काही महिन्यांपूर्वी बॉयफ्रेंड झहीर इक्बालशी लग्न केलं.



# 'हिना खान'चं लवकरच कमबॅक

बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानचा रिलिटी शो 'बिग बॉस १८' टीव्हीवर ६ आठवड्यांहून अधिक काळ चालणार आहे. शोमध्ये दररोज काहीतरी नवीन पाहायला मिळत आहे. दरम्यान, शोशी संबंधित एक मोठे अपडेट समोर येत आहे. अभिनेत्री हिनाजी दीर्घकाळापासून कॅन्सरसारख्या आजाराशी लढत आहे. अभिनेत्री 'हिना खान' या वीकेंडच्या वॉरमध्ये सलमान खानसोबत दिसणार आहे. नुकतीच हिनाची केमोथेरपी झाली होती आणि केमोथेरपीनंतर ती पहिल्यांदाच टीव्हीवर दिसणार आहे. हिना 'बिग बॉस ११' च्या सीझनची रनर अप होती आणि या शोमधील तिची ताकद आणि धैर्य पाहून चाहत्यांनी तिचे नाव 'शेर खान' ठेवले होते. 'बिग बॉस ११' नंतर हिना खान 'बिग बॉस १४' मध्येही दिसली होती. जिथे ती मार्गदर्शक म्हणून पोहोचली होती. हिना शेवटची पंजाबी फिल्म 'शिंदा शिंदा नो पापा' मध्ये दिसली होती. त्यानंतर तिने चाहत्यांना तिच्या कॅन्सरची माहिती दिली आणि ब्रेकवर गेली. गेल्या आठवड्यात एकाही सदस्याला बाहेर काढण्यात आले नाही. मात्र, या आठवड्यात दोन सदस्य बाहेर जाऊ शकतात. ज्यांना नामांकन मिळाले आहे त्यात विवियन डिसेना, करणवीर मेहरा, दिग्विजय राठी, चाहत पांडे, अविनाश मिश्रा, कशिश कपूर आणि एलिस कौशिक यांच्या नावांचा समावेश आहे. मात्र अशा परिस्थितीत हिना घरातील कुटुंबीयांना काय सल्ला देणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. हिनाचे चाहते तिला दीर्घ काळानंतर पुन्हा टीव्हीवर पाहण्यासाठी उत्सुक आहेत. एका चाहत्याने सांगितले की, 'बऱ्याच दिवसांनी तो हिनाला टीव्हीवर दिसणार आहे'. तर दुसऱ्याने लिहिले की, 'हिनाच्या आगमनावर तो आनंदी आहे'. असे अनेक मेसेज ध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.



# रश्मिकाच्या चित्रपटात नवाजुद्दीन खलनायक

अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीला आगामी वॅम्पायर कॉमेडी चित्रपट 'थम्बा'मध्ये खलनायकाच्या भूमिकेसाठी निवडण्यात आले आहे. आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट दिनेश विजान यांच्या हॉरर-कॉमेडी युनिव्हर्सचा हिस्सा आहे. थम्बा या चित्रपटात नवाजुद्दीनची व्यक्तिरेखा हिंसक असल्याचे समजते. ही व्यक्तिरेखा प्राचीन विजयनगर साम्राज्याशी संबंधित दर्शविण्यात येणार आहे. थम्बा या चित्रपटाच्या मुख्य कलाकारांनी स्वतःच्या भूमिकांसाठी तयारी सुरू केली आहे. रश्मिका मंदानाची लुक टेस्ट मागील महिन्यात पार पडली आहे. आदित्य सरपोतदार याच्या दिग्दर्शनातील हा चित्रपट नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस किंवा डिसेंबरच्या प्रारंभी प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे. या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारणे नवाजुद्दीनसाठी एक रोमांचक आव्हान असणार आहे. नवाजुद्दीनने यापूर्वी २०१५ मध्ये प्रदर्शित 'बदलापूर', २०१७ मध्ये प्रदर्शित 'मुन्ना मायकल', २०१४ मध्ये प्रदर्शित 'किक' आणि २०१९ मध्ये प्रदर्शित 'पेट्टा' या चित्रपटांमध्ये खलनायकाची भूमिका साकारत प्रेक्षकांची मने जिंकली होती.



# देवरकोंडाने रश्मिकासोबतचे अफेअर रिलेशनशिप केले कन्फर्म



दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा या दोघांच्या डेटींगच्या अनेकदा चर्चा रंगल्या आहेत. या दोघांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले असून त्यांची जोडी चाहत्यांना खूप आवडते. मात्र दोघांनी वारंवार एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा फेटाळल्या आहेत. रश्मिकासोबतच्या अफेअरच्या चर्चांदरम्यान विजय देवरकोंडाने आता मोठा खुलासा केला आहे. विजयने तो रिलेशनशिपमध्ये असल्याचं कन्फर्म केलं आहे. विजय देवरकोंडानं एका मुलाखतीत सांगितले की, प्रेमात पडताना कसं वाटतं हे मला माहित आहे. पण, बिनशर्त प्रेम माहित नाही. कारण प्रेम अपेक्षांसह येते आणि त्यामुळे माझे प्रेम बिनशर्त नाही. मला वाटतं सगळंच ओव्हर-रोमँटिक झाले आहे. बिनशर्त प्रेमाची अपेक्षा करणे योग्य आहे की नाही हे देखील मला माहित नाही. यावेळी विजयने तो त्याच्या एका सह-अभिनेत्रीला डेट करत असल्याचे देखील स्पष्ट केले. तो म्हणाला, मी डेटवर जात नाही. एखाद्याला खूप दिवसांपासून ओळखून आणि मैत्री करूनच मी बाहेर जातो. मी ३५ वर्षांचा आहे, मी सिंगल राहीन असे तुम्हाला वाटते का? असे त्याने म्हंटल्याने रश्मिकासोबतच्या त्याच्या नात्यांची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. विजय देवराकोंडा लग्नाबाबत म्हणाला, लग्न करणे हे महिलांसाठी खूप आव्हानात्मक आहे. लग्न एखाद्याच्या करिअरच्या आड येऊ नये. स्त्रियांसाठी विवाह करणे कठीण आहे. तुम्ही कोणत्या व्यवसायात आहात यावरही ते अवलंबून असते.' विजयच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, तो तेलुगू चित्रपट "VD12' आणि 'जेजीएम-जण गण मन' या पुरी जगन्नाथ यांच्यासोबतच्या चित्रपटांमध्ये पाहायला मिळणार आहे. विजय आणि दिग्दर्शक पुरी जगन्नाथ यांनी 'लायगर' चित्रपटातही एकत्र काम केले होते.

## 'कांतारा'च्या मेकर्सकडून 'महावतार नरसिंह'ची घोषणा

'कांतारा' सिनेमा आला आणि प्रचंड गाजला. ऋषभ शेट्टीच्या तगड्या अभिनयाने सिनेमा प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरला. 'कांतारा'च्या मेकर्सने अर्थात होमबाले फिल्म्सने त्यांच्या आगामी पौराणिक सिनेमाची घोषणा केलीय. 'महावतार नरसिंह' असं या सिनेमाचं नाव असून काही दिवसांपूर्वी सिनेमाचं मोशन पोस्टर भेटीला आलं. 'महावतार नरसिंह' सिनेमात भारतीय मनोरंजन विश्वातील एक सुपरस्टार झळकण्याची शक्यता आहे. कोण आहे तो? सुरुवातीलाच सांगायला हवं की, 'महावतार नरसिंह' सिनेमा हा एक ॲनिमेशन सिनेमा असून त्याचा 3D मध्येही प्रेक्षकांना अनुभव घेता येईल. या सिनेमात नरसिंहाच्या प्रमुख भूमिकेत सुपरस्टार प्रभास झळकणार असल्याची शक्यता आहे. अर्थात याबद्दल अजून कोणतीही अधिकृत खुलासा झाला नाहीये. प्रभासने याआधीही 'आदिपुरुष' सिनेमात श्रीरामांची भूमिका तर 'कल्की २८९८ एडी' सिनेमात कर्णाची भूमिका साकारली. त्यामुळे प्रभास नरसिंहाच्या पौराणिक भूमिकेत दिसण्याची शक्यता वर्तवण्यात येतेय. 'महावतार नरसिंह' सिनेमाच्या रिलीज डेटबद्दल अजून कोणताही खुलासा झाला नाहीय. तरीही २०२५ ला हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येईल अशी शक्यता वर्तवण्यात येतेय. या सिनेमात प्रभासच्या चेहर्‍याचा ॲनिमेशन रुपात वापर करण्यात येईल आणि त्याचा आवाजही आपल्याला ऐकायला मिळेल अशी चर्चा आहे. अशाप्रकारे 'कांतारा'नंतर होमबाले फिल्सम्स पुन्हा एकदा विष्णुच्या नरसिंह अवताराची पौराणिक कथा दाखवणार आहे.



## राम चरण-कियाराच्या 'गेम चेंजर'ची रिलीज डेट कन्फर्म



तेलुगू सुपरस्टार राम चरणचा चित्रपट 'गेम चेंजर' या वर्षातील मोस्ट अवेटेड चित्रपटांपैकी एक आहे. अभिनेत्याने त्याच्या आगामी चित्रपटाचे शूटिंगही पूर्ण केले आहे. एस शंकर दिग्दर्शित या चित्रपटात राम चरणसोबत कियारा अडवाणी दिसणार आहे. या चित्रपटाच्या पोस्टरने चाहत्यांची उत्सुकता आताच वाढवली आहे. आता निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. या महिन्याच्या सुरुवातीला रामचरणने चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केल्याची घोषणा केली होती.

इंस्टाग्रामवर, अभिनेत्याने चित्रपटाच्या सेटवरील पहिल्या दिवसाचा आणि शूटिंगच्या शेवटच्या दिवसाचा फोटो देखील शेअर केला आहे. त्याने चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाल्याचे सांगितले होते. हा एक राजनितीक ड्रामा आहे. गेंम चेंजर हा चित्रपट १० जानेवारी, २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. रामचरण आणि कियारा अडवाणी व्यतिरिक्त या चित्रपटात अंजली, एसजे सूर्या, जयराम, सुनील, श्रीकांत, समुथिराकनी आणि नस्सर यांसारखे कलाकार दिसणार आहेत. या चित्रपटात राम चरण राम मदन या आईएएस अधिकार्‍याची भूमिका साकारताना दिसणार आहे. कियारा अडवाणीने चित्रपटात त्याच्या लेडी लव्हची भूमिका साकारली आहे, यासोबतच तीदेखील आईएएस अधिकारी असेल. या चित्रपटाचे दिग्दर्शन शंकर यांनी केले असून हा त्यांचा पहिला दिग्दर्शकीय चित्रपट आहे. चित्रपटाची पटकथा कार्तिक सुब्बाराज यांनी लिहिली आहे. थमन यांनी चित्रपटाला संगीत दिले आहे.



# प्रसाद ओक आणि स्वप्निल जोशी पहिल्यांदाच एकत्र

अभिनेता प्रसाद ओक आणि स्वप्नील जोशी यांची जोडी पहिल्यांदाच एका चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'जिलबी' असे या चित्रपटाचे नाव आहे. समोर आलेल्या पोस्टरमध्ये प्रसाद, स्वप्नीलचा जबरदस्त लूक पाहायला मिळत आहे. यात अभिनेत्री शिवानी सुर्वे देखील पाहायला मिळत आहे. या तिघांच्या जोडीसह पर्ण पेठे, गणेश यादव, प्रणव रावराणे, अश्विनी चावरे, प्रियांका भट्टाचार्य या कलाकारांनी आपल्या अभिनयाने मनोरंजनाच्या या 'जिलबी'चा रंगत वाढवली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन नितीन कांबळे यांनी केले असून १७ जानेवारीला 'जिलबी' चित्रपट मनोरंजनासाठी सज्ज होणार आहे. आनंद पंडित यांनी चित्रपटांची निर्मिती केली आहे. 'जिलबी'च्या निमित्ताने रसिक प्रेक्षकांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेन्मेन्ट प्रा.लिमिटेड यांच्या सहयोगाने मनोरंजनाची भन्नाट मेजवानी आणली आहे. स्वप्नील आणि प्रसाद एकत्र झळकणार असल्याने सध्या प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. शिवानी सुर्वे प्रमुख भूमिका साकारणार आहे. त्यामुळे या तिघांची गोष्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. दरम्यान, 'जिलबी' चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद मच्छिंद्र बुगडे यांचे आहेत. तर छायांकन गणेश उतेकर, कलादिग्दर्शन कौशल सिंग यांचे असून क्रिएटिव्ह दिग्दर्शन राहुल व्ही. दुबे यांचे आहे. हा चित्रपट पुढील वर्षी १७ जानेवारी २०२५ ला प्रेक्षकांना पाहता येणार आहे.

# 'मिशन अयोध्या' राम जन्मभूमीत चित्रित झालेला पहिला चित्रपट




अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या ऐतिहासिक निर्मितीनंतर प्रथमच मराठी चित्रपटाच्या रुपेरी पडद्यावर भव्य दृश्यांमधून रामलल्लाच्या मूर्तीचे दर्शन चित्रपट रसिक भक्तांना घडणार आहे. चांदण्याच्या तेजाने झळाळणारी मूर्ती, भक्तांच्या हृदयात विश्वास जागवणारे रामलल्लाचे मोहक हास्य आणि त्यांचे करुणामय डोळे हे सगळं प्रेक्षकांना त्यांच्या श्रद्धेच्या गाभार्यात घेऊन जाणार आहे. रामलल्लाचे अनोखे दर्शन घडवणारा 'मिशन अयोध्या' हा भारता-तला पहिला चित्रपट आहे. अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मंदिराची स्थापना झाल्यानंतर कोणत्याही चित्रपटाचे अयोध्येत चित्रीकरण झाले नाही. ही संधी दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे आणि निर्माते कृष्णा दादाराव शिंदे, योगिता कृष्णा शिंदे यांच्या 'आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि.' निर्मित 'मिशन अयोध्या' या चित्रपटाद्वारे उपलब्ध झाली आहे. नव्या वर्षात २३ जानेवारी रोजी राममंदिर स्थापनेच्या प्रथम वर्षपूर्तीचे औचित्य साधून 'मिशन अयोध्या' महाराष्ट्रातील चित्रपटगृहांतून प्रदर्शित होणार आहे.

दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे हे 'मिशन अयोध्या'च्या अयोध्येतील चित्रीकरणाचा अनुभव वर्णन करताना म्हणाले, अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराच्या पवित्र परिसरात चित्रीकरण करणे हे केवळ माझ्यासाठी नव्हे, तर संपूर्ण युनिटसाठी एक अभूतपूर्व अनुभव ठरला. विषम तापमानाच्या आव्हानांवर मात करीत असताना लाखो रामभक्तांच्या गर्दीत, त्या पवित्र भूमीत चित्रीकरण करताना प्रत्येक क्षण प्रेरणादायी होता. मंदिराच्या भव्य वास्तुशिल्पाचा प्रत्येक कोपरा, वातावरणातील अलौकिक शांतता आणि लाखो रामभक्तांद्वारे होणारा रामनामाचा गजर आमच्या हृदयाला स्पर्शून गेला.

'मिशन अयोध्या' हा केवळ एक चित्रपट नसून, अयोध्या, श्रीराम मंदिर व श्रीरामांचे आदर्श विचार जगभर पोहचविण्याचे एक मिशन आहे. हा चित्रपट प्रभू श्रीरामांच्या अनंत भक्तीसाठी समर्पित एक अद्भुत प्रवास आहे. मला विश्वास आहे की 'मिशन अयोध्या' प्रेक्षकांना प्रभू श्रीरामांच्या चरणांशी आत्मीयतेने जोडेल आणि त्यांच्या जीवनात सकारात्मकता निर्माण करेल. निर्माते कृष्णा दादाराव शिंदे आणि योगिता कृष्णा शिंदे त्यांचे मनोगत व्यक्त करताना म्हणाले 'मिशन अयोध्या' या चित्रपटातून अत्यंत ज्वलंत विषयावर प्रकाश टाकण्यात आला असून प्रेक्षकांना मनोरंजनासोबतच रामभक्ती, श्रद्धा आणि सामाजिक मूल्यांचा अनोखा संगम पहायला मिळणार आहे. अत्यंत जिव्हाळ्याचा विषय मांडणार्या 'मिशन अयोध्या' या चित्रपटाचे अयोध्येसह उत्तर प्रदेशातील जौनपूर तसेच महाराष्ट्रात, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर अश्या विविध ठिकाणी चित्रीकरण झाले आहे. या चित्रपटाच्या शीर्षकामुळे या चित्रपटाविषयी रसिकांच्या मनात विशेष कुतूहल निर्माण झाले आहे.

# 'या' अभिनेत्रींसोबत झळकणार गौतमी पाटील?

सोशल मीडिया स्टार आणि लावणी डान्सर असलेल्या गौतमी पाटीलला सध्या कोणत्याही परिचयाची गरज नाही. नखरेल अदांनी गौतमी चाहत्यांना घायाळ करत असते. अनेकदा गौतमी ट्रेंडिंग गाण्यावरील रील्सही शेअर करताना दिसते. तिचे हे व्हिडीओ चर्चेत येत असतात. गौतमीने अमेय वाघ आणि अमृता खानविलकर यांच्या 'लाइक आणि सबस्क्राइब' या सिनेमात आयटम साँग केले होते. लिंबू फिरवलं असे या गाण्याचे नाव असून या गाण्याला प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर आता तिचा सोशल मीडियावरील एक व्हिडीओ चर्चेत आला आहे, हा व्हिडीओ पाहून ती सई ताम्हणकर आणि अलका कुबल यांच्यासोबत काम करणार असल्याची चर्चा रंगली आहे. डान्सर गौतमी पाटील हिचा सोशल मीडियावरील एक व्हिडीओ चर्चेत आला आहे. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर नेटकरी गौतमी सई ताम्हणकर आणि अलका कुबल यांच्यासोबत काम करताना दिसेल, असा तर्कवितर्क लावत आहेत. खरेतर हा व्हिडीओ एअरपोर्टवरचा वाटतो आहे. यात गौतमी सुरूवातीला अलका कुबल यांच्याशी बोलताना दिसत आहे. त्यानंतर या व्हिडीओत सई ताम्हणकर, संजय खापरे आणि शिव ठाकरेदेखील पाहायला मिळतो आहे. या व्हिडीओत काहीच संभाषण ऐकायला मिळत नाही आहे. हा व्हिडीओ गौतमीने शेअर केला असून तिने कॅप्शनमध्ये लिहिले की, खूप छान वाटलं सगळ्यांना भेटून. गौतमीच्या या व्हिडीओला चाहत्यांची पसंती मिळताना दिसते आहे. सर्वजण या लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर नेटकरी ती अलका कुबल, सई ताम्हणकर, संजय खापरे आणि शिव ठाकरे यांच्यासोबत सिनेमात काम करताना दिसणार का, असे तर्कवितर्क लावत आहेत. त्यामुळे याबाबत गौतमी कधी खुलासा करते, हे पाहणे कमालीचे ठरणार आहे.



# ‘हेरा फेरी ३’ची प्रतीक्षा संपली




बॉलीवूडच्या विनोदी चित्रपटांमध्ये ‘हेरा फेरी’ आणि ‘फिर हेरा फेरी’ या चित्रपटांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. अतरंगी संवाद, अफलातून पटकथा आणि अक्षय कुमार, परेश रावल, सुनील शेट्टी यांच्यातील भन्नाट केमिस्ट्रीमुळे हे चित्रपट प्रेक्षकांच्या मनावर कायमचे कोरले गेले आहेत. आजही या चित्रपटांचे विनोदी प्रसंग आणि संवाद चाहत्यांना खळखळून हसवतात. या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची, ‘हेरा फेरी ३’ ची अनेक वर्षांपासून चाहते आतुरतेने वाट पाहत होते. यामध्ये पहिल्या दोन भागातील मूळ कलाकार पुन्हा एकत्र येणार असल्याच्या बातमीने प्रेक्षकांच्या अपेक्षा अधिकच उंचावल्या आहेत. अनेक अफवांनंतर अखेर ‘हेरा फेरी ३’ बद्दल एक खात्रीलायक बातमी आल्याने चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह पसरला आहे. एका मुलाखतीत अक्षय कुमारने ‘हेरा फेरी ३’ बद्दल महत्त्वाची माहिती दिली. त्याने सांगितले की, सध्या त्यांची टीम ‘वेलकम’ चित्रपटावर काम करत आहे. मात्र, निर्मात्यांचे सध्याचे चित्रपट झाल्यानंतर ‘हेरा फेरी ३’ची निर्मिती सुरू होईल. पुढील वर्षी चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात होण्याची शक्यता आहे, असेही त्याने नमूद केले. ‘हेरा फेरी’ हा चित्रपट प्रियदर्शन यांनी दिग्दर्शित केला होता. यामध्ये अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. चित्रपट प्रचंड यशस्वी ठरला आणि त्यातील कलाकारांच्या कॉमेडीच्या उत्कृष्ट टायमिंगमुळे चित्रपट प्रेक्षकांना भावला. त्यानंतर आलेल्या ‘फिर हेरा फेरी’मध्ये श्रीमंत झालेल्या राजू , श्याम आणि बाबूराव या तीन पात्रांची संपत्ती पुन्हा फसवणुकीत कशी गेली, याची कथा दाखवण्यात आली होती. ‘हेरा फेरी ३’ हा सिनेमा पहिल्या दोन सिनेमांप्रमाणे विनोदाचा ठसा कायम ठेवत प्रेक्षकांचे मनोरंजन करतो का, याबद्दल त्यांच्यामध्ये प्रचंड उत्सुकता आहे. अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल यांना पुन्हा एकत्र पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत. या चित्रपटाकडून प्रेक्षकांना मोठ्या प्रमाणावर मनोरंजनाची अपेक्षा आहे.

# शाहरुख दोन्ही मुलांसह नव्या चित्रपटासाठी येणार एकत्र

बहुप्रतीक्षित ‘मुफासा : द लायन किंग’चा दुसरा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, रिलीजपूर्वी चाहत्यांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. एक मिनीट ५६ सेकंदांच्या या ट्रेलरने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. डोळे दीपवणाऱ्या अप्रतिम दृश्यांसह आणि उत्कंठावर्धक कथानकाने या चित्रपटाने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. बारी जेनकिन्स दिग्दर्शित या चित्रपटात हिंदी डब्ब व्हर्जनसाठी मोठ्या कलाकारांचा सहभाग असल्याने भारतीय चाहत्यांमध्ये विशेष उत्साह आहे.

‘मुफासा : द लायन किंग’च्या हिंदी डब्ब व्हर्जनमध्ये शाहरुख खान, त्याचा मोठा मुलगा आर्यन खान व लहान मुलगा अबराम यांनी आवाज दिला आहे. शाहरुख खान मुफासा, आर्यन सिंबा, तर अबराम लहान मुफासाला आवाज देणार आहेत. २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘द लायन किंग’ या चित्रपटाच्या अभूतपूर्व यशानंतर मुफासा : द लायन किंग हा चित्रपटाचा पुढील भाग येणार आहे. नवीन ट्रेलरमध्ये मुफासा आणि टाका यांच्यातील सुरुवातीच्या मैत्रीची झलक दिसून येते. मुफासा एक अनाथ सिंह आहे; तर टाका सत्ताधारी राजा असलेल्या सिंहाचा वारसदार आहे. सुरुवातीला टाकाच्या वडिलांनी ही मैत्री नाकारली असली तरी पुढे ही दोस्ती घट्ट होत जाते. दोघे मिळून अनेक अडचणींना सामोरे जातात आणि एकमेकांसाठी लढतात. या प्रवासामध्ये



त्यांचे बंध दृढ होत जातात. ट्रेलरमध्ये त्यांच्या संघर्षाचा आणि पुढे आयुष्यभर टिकणाऱ्या नात्याचा प्रवास प्रभावीपणे दाखवला आहे. या चित्रपटाच्या तेलुगू डब्ब व्हर्जनमध्ये महेश बाबू ‘मुफासा’ला आवाज देणार आहे आणि त्यामुळे तेलुगू चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. त्याचप्रमाणे तमीळ व्हर्जनसाठी अभिनेता अर्जुन दास ‘मुफासा’ला आवाज देणार आहे.

# मी प्रामाणीक असल्याने राजकारणात आले नाही



अभिनेत्री रवीना टंडनने सिनेसृष्टीतील एक काळ चांगलाच गाजवला. मात्र अभिनयासह रवीना तिच्या स्पष्टवक्तेपणासाठी देखील चर्चेत असते. सध्या सोशल मीडियावर तिचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यानंतर तिच्या राजकारणातील प्रवेशाबाबतची चर्चा रंगली आहे. तिला अनेकदा राजकारणातील एन्ट्रीची ऑफरही आली होती, मात्र तिने प्रत्येकवेळी नकार दिला. यामागचे कारणही तिने सांगितले आहे. रवीनाने व्हिडिओमध्ये तिच्या प्रामाणिकपणाच्या सवयीमुळे आणि चुकीचं काम सहन न होत असल्यामुळे राजकारणात राहणं तिच्यासाठी आव्हानात्मक असल्याचे सांगितले. व्हिडिओत रवीना म्हणाली की, मी प्रामाणिक आहे आणि चुकीची कामं सहन करु शकत नाही. याच सवयींमुळे मी कधी राजकारणात उतरले नाही. मी ज्या दिवशी राजकारणात येईन त्या दिवशी माझ्या या सवयींमुळे मला कोणीही गोळी मारतील. मी सत्याला खोट्यात बदलू शकत नाही. माझ्यासाठी हे कठीण आहे. पुढे ती म्हणाली, मला जे आवडत नाही ते माझ्या चेहऱ्यावर लगेच दिसून येतं आणि मग मी त्या गोष्टीसाठी लढते. आजच्या जगात प्रामाणिकपणा चांगली गोष्ट राहिलीच नाही. त्यामुळे जेव्हा जेव्हा मला कोणीही राजकारणात येण्यास सांगतं तेव्हा मी म्हणते की, मी आले तर लवकरच माझी हत्या केली जाईल. तिने राजकारणात येण्याचेही निश्चित केले होते. त्याबाबत तिने सांगितले की, एक वेळ अशी आली होती जेव्हा मी खरंच राजकारणात यायचा विचार केला. पश्चिम बंगाल, मुंबई आणि पंजाबसह अनेक राज्यांतून मला जागा ऑफर झाल्या होत्या. पण मी हो म्हणू शकले नाही. त्यामुळे ही ऑफर मी नाकारली होती. रवीना टंडनच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, अभिनेत्रीने १९९१ मध्ये ‘पत्थर के फुल’ या सिनेमातून अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं. त्यानंतर तिने ‘मोहरा’, ‘दिलवाले’, ‘आतिश’ यांसारख्या अनेक सुपरहिट सिनेमांमध्ये काम केले. ती शेवटची ‘पटना शुक्ला’मध्ये वकिलाच्या भूमिकेत पाहायला मिळाली होती.

# नाचाची गाणी तेव्हा, आता...!

असलेले खिसे भरभरून पैसा वाहू लागला की, नादान माणसाला कुबेराशी स्पर्धा करावीशी वाटते. त्याच्या बुद्धीचा तोल जातो आणि तो गुर्मीत काही चुकीच्या चाली खेळतो. चित्रपटसृष्टीत अशा निर्माते, कलाकारांचा सुळसुळाट झाला आहे. त्याची उदाहरणेही काही देता येतील. १९४० च्या आसपास एस. एस. वासन यांचे दोन चित्रपट यशस्वी ठरले आणि अमाप पैसा हाती आला. त्या मस्तीत त्यांनी लगेच नव्या चित्रपटाच्या नावाची घोषणा केली. नाव होतं 'चंद्रलेखा'. वासन तेव्हा मोठे निर्माते होते. त्यामुळे त्यांच्या बॅनरला वजन होतं. त्यांनी चंद्रलेखा टायटल जाहीर केलं खरं, परंतु ना कथेचा पत्ता ना संकल्पना कुणाला ठाऊक! अखेर परदेशी लेखकाच्या संकल्पनेवरून तामीळ भाषेत चित्रपट निर्माण करायचं कामही सुरू झालं.




'दी फ्रेंच बँडिट इन इंग्लंड' या कथेवर सिनेमा आधारित होता. त्याच वेळी टी. जी. राघवाचारी, वासन यांचे मूळ दिग्दर्शक व वासन यांच्यात काही मतभेद झाले व त्यांचे संबंध तुटले. त्यामुळे वासन यांनी चित्रपटाची सूत्रे हाती घेतली. त्यात कथेत बदल होत राहिले. भूमिका बदलत गेल्या. कलाकार बदलत गेले. या घडामोडींमुळे चित्रपट पूर्ण व्हायला पाच वर्षे लागली व त्यात निम र्त्याचा बराचसा पैसा वायफळ खर्च झाला. सिनेमा पूर्ण करण्यासाठी त्याला कर्ज काढावे लागले. अनेक गोष्टी विकाव्या लागल्या. या सिनेमाची जमेची बाजू होती सिनेमाचं संगीत. एस. राजेश्वरराव आणि एम. डी. पार्थसारथी या चित्रपटाचे संगीतकार होते तर सिवन आणि सुब्बु गीतकार होते. चित्रपटाच्या संगीताची संकल्पना हिंदुस्तानी आणि पाश्चिमात्य संगीताच्या मिश्रणातून साकारण्यात येत होती. त्यातील एक दरबारी थाटाचं पार्श्वसंगीत, तोपर्यंत प्रदर्शित झालेल्या सिनेमांच्या गाण्यातील सर्वाधिक लांबीचे गाणे होते. या दृश्यासाठी जो विविध, तालवाद्यांचा भव्य सेट निर्माण करण्यात आला होता, ती वाद्ये आणि विशाल महाल असे ते नेपथ्य होते. तोवर भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात इतक्या मोठ्या बजेटचे संगीत निर्माण झाले नव्हते. असा हा बिग बजेटचा चित्रपट ९ एप्रिल १९४८ साली तामीळ भाषेत प्रदर्शित झाला खरा, परंतु त्याला म्हणावा तसा प्रतिसाद लाभला नाही.

वासन यांना हा जबरदस्त धक्का होता. आता गेलेला पैसा परत कसा मिळवायचा, याकरिता चित्रपटसृष्टीतील काही जाणकारांचा सल्ला घेऊन त्यांनी 'चंद्रलेखा' हिंदीत रूपांतरित करण्याचे ठरवले. त्यासाठी सर्व संवाद हिंदीत भाषांतरित करावे लागणार होते. ते काम आगा जानी कश्मिरी आणि पंडित इंद्र यांनी पूर्ण करून दिलं. अशाप्रकारे मूळ दाक्षिणात्य भाषेत निर्माण झालेल्या चित्रपटाला, हिंदीचे झबले-टोपरे घालून तो चित्रपट भारतभर प्रदर्शित करण्यात आला. काय आश्चर्य, हिंदी चित्रलेखाने व्यावसायिक बाजारात गेलेला खर्च केलेला पैसा परत मिळवून दिला. तोपर्यंत दाक्षिण्यात चित्रपटांना त्यांच्या भाषा व चेहऱ्यामुळे हिंदी प्रेक्षक पाहत नव्हते. त्यांना चंद्रलेखाने चित्रपटसृष्टीची बाजारपेठ खुली करून दिली.

१९६० ते १०७० व त्यानंतर हळूहळू साऊथच्या सिनेमांनी हिंदीतील कलाकारांना आपल्यात सामावून घेतलं. याचा परिणाम दाक्षिणात्य कलाकारांनी हां हां म्हणता हिंदी सिनेसृष्टी काबीज केली व आपल्या व्यावसायिक शिस्तीच्या जोरावर हिंदी साहित्यसृष्टीतील दर्जेदार लेखक, गीतकार, संगीतकारांना घेऊन समृद्ध, सुरेल संगीताची परंपरा निर्माण केली. संगीत संयोजनाच्या पद्धतीत बदल झाला. शंकर जयकिशन यांच्याच नव्हे तर संगीतकार नौशादजींनीही शेकडो वादकांना घेऊन वाद्यांनी परिपूर्ण असलेली गाणी पडद्यावर आणली. ज्यामुळे निर्मात्यांना दर्जेदार संगीताची गरज पूर्ण करण्यासाठी, तशीच भव्यदिव्यता, नृत्य, वेशभूषा व रंगसंगतीतून पडद्यावर आणावी लागली. त्यामध्ये मैलाचा दगड ठरला चित्रपट 'सुरज'. तोही मद्रासच्या निर्मात्यांचा चित्रपट होता. त्यानंतर एक सोडून दुसऱ्या चित्रपटात नायक, नायिका व त्यांच्यासोबत नायकांना सोबत करणारे रंगबिरंगी कपड्यातील त्यांचे सखे तर नायिकेबरोबर ठुमकणाऱ्या त्यांच्या सख्या. नाचता नाचता गाण्यातून सवाल जवाब करीत. नृत्याविष्काराचे असे रंजक दर्शन घडविणारी नवी नृत्यरचना फार खर्चिक पण गरजेची झाली. 'मिलन' सिनेमातही कालांतराने 'बोल गोरी बोल तेरा कौन पिया' सारखं गाणं आलं. लक्ष्मीकांत प्यारेलालांची अशी गाणी निर्माण करण्याची परंपरा 'हसता हुवा नूरानी चेहरा' पासूनची आहे. या गाण्यांमध्ये सामूहिक नृत्यरचनाबंध महत्त्वाचे असायचे. शिवाय स्त्री-पुरुषांच्या सामूहिक रंगसंगाची आकर्षकता पडद्यावर खुलून दिसायची. 'होंठो में ऐसी बात' याच शैलीतील आणखी एक अविस्मरणीय गाणं. यापूर्वी अशा गाण्यात राजेंद्र कुमार, सुनील दत्त सारखे नायक कामचलाऊ नृत्य करीत असत तर 'होंठो में ऐसी बात' या तालवाद्यांनी खेळविल्या गेलेल्या गाण्यात वैजयंतीमालासमोर देवानंदला इतका दूर ठेवला आहे की, त्यात दिग्दर्शक विजय आनंदची हुशारी दिसून येते. अशा खर्चिक नृत्यात नृत्यनिपुण नायक असेल तर पब्लिकला शिट्ट्या वाजवण्याचा आनंद लुटता येतो. त्या जागी जितेंद्र आला व त्या काळात त्याने अशा गीतांमध्ये जान आणली. अशा समूहनृत्यात प्रसन्नता होती. गाण्यांच्या चाली, वाद्यवृंद संयोजन, शब्द एकमेकात मिसळून जायचे. प्रसंगाला अनुसरून गाणी निर्माण केली जायची. मध्येच 'ताकी हो ताकी,' 'ता थैया ता थैया हो' अशा गाण्यांनी नृत्य आणि नेपथ्याचं तंत्रच बदलून टाकलं. त्यात त्यांना यश लाभलं.

हिंदी सिनेमा आणि गाणी म्हणजे 'दो दिल एक जान है हम' अशी स्थिती राज कपूरच्या काळात कृष्णधवल चित्रपटाच्यावेळी होती. आर. के. प्रॉडक्शनने भव्यदिव्य सेट लावून शंकर-जयकिशनच्या गाण्यांचे सोने केले. 'घर आया मेरा परदेसी', 'रमय्या वस्तावय्या' या गाण्यांना आज आपण पाहू शकतो, ही माध्यमांची कृपा. त्याच राज कपूरने महत्त्वाकांक्षी 'जोकर'साठी पाण्यासारखा पैसा गाण्यावर खर्च केला, पण शेवटी पैसा पाण्यात गेला. अर्थपूर्ण गाणी त्यासाठी आर्थिक क्षमता असणाऱ्या राजने माघार घेतली व 'बॉबी'मध्ये लक्ष्मीकांत प्यारेलालना संधी देऊन शंकर-जयकिशनबरोबरचा घरोबा तोडला. कारण तोपर्यंत शंकर-जयकिशन जोडीच्या संगीत संयोजनातील नावीन्य लोपलं होतं? की नव्याने म्युझिक इंडस्ट्रीत आलेल्या तरुण संगीतकारांचे म्युझिक टेक्निक वरचढ ठरत होतं? भारतीय शास्त्रीय संगीताचा तो अभ्यासक असेल. वाद्य आणि ॲडव्हान्स डिजिटल म्युझिक प्रोग्राम करण्यात त्याची मास्टरी असेल, पण म्हणून त्याने काहीही वाजवावे आणि आपण त्याला डोक्यावर घ्यावं, असा नियम नाही. पेरू देशातील आचू माचू या संरक्षित क्षेत्रात, जिथे कधी कुणा देशाबाहेरील लोकांना चित्रीकरण करू देत नाहीत अशा निसर्गरम्य ठिकाणी जाऊन या गाण्याचे चित्रिकरण केलं आहे. यासाठी चार कोटी रुपयांची धूळधाण! या गाण्यातील नाचणाऱ्या पोरी म्हणजे आदिवासी? काय या दाक्षिणात्य दिग्दर्शक, निर्माते, संगीतकारांच्या कल्पना? हिंदी भाषेची विल्हेवाट. २०१० ते नंतर पाच वर्षे हे गाणं म्हणे म्युझिक लिस्टमध्ये एक नंबर होतं? नशीब आपलं की रेहमानला नव्या 'बैजू बावरा'चं संगीत करायला देत नाहीत. नाहीतर तानसेन गिटार वाजवून पैशाचा पाऊस पाडेल. पियानो वाजवून दीप प्रज्वलित करेल. काय अवस्था आहे पाहा भारतीय संगीताची! संजय लीला भन्साळी, रोहित शेट्टी, आचरट करण जोहर आणि इतर गाण्यांवर दहा कोटींच्या आसपास खर्च करीत आहेत. सिनेमांचा निर्मिती खर्च २०० कोटींच्याही वर गेला आहे. लोणावळा, खंडाळ्याला धावणारे परदेशातील जंगलं शोधताहेत. या गाण्यांचं आयुष्य महिने दोन महिनेही असत नाही; तिथे आम्ही 'ओ सजना बरखा बहार आयी' ऐकत तंद्री लावतो. पाहुया शेवटच्या भागात अशाच डफ्फर गीतांचा चोर बाजार. (लेखक, सिने संगीतकार-समीक्षक आहेत.)



# शाहरुख-प्रीतीचा 'हा' चित्रपट पुन्हा रिलीज

बॉलीवूडचा किंग खान याचे लाखो चाहते आहेत. शाहरुखचा प्रत्येक चित्रपट चाहते डोक्यावर उचलून घेतात. शाहरुखने गेल्या काही वर्षांत बॉलीवूडला एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. त्यात ॲक्शन आणि थ्रिलर चित्रपटांसह अनेक कॉमेडी आणि रोमँटिक चित्रपटांची मेजवानी प्रेक्षकांना मिळाली आहे. अशात काही दिवसांपासून टॉलीवूडसह बॉलीवूडमध्येदेखील नव्वदच्या काळात प्रदर्शित झालेले चित्रपट पुन्हा एकदा प्रदर्शित केले जात आहेत. त्यामध्ये शाहरुखचा प्रचंड गाजलेला एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. २००३ मध्ये 'कल हो ना हो' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटात शाहरुख खान, प्रीती झिंटा व सैफ अली खान अशी तगडी स्टारकास्ट होती. त्या काळी हा चित्रपट इतका गाजला की, ८६० दशलक्षांची कमाई 'कल हो ना हो'ने केली होती. त्यामुळे आता निर्मात्यांनी पुन्हा एकदा हा चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय घेत 'कल हो ना हो' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. धर्मा प्रॉडक्शनच्या ऑफिशियल इन्स्टाग्राम अकाउंटवर याबाबत एक पोस्ट शेअर करण्यात आली होती. त्यामध्ये लाल अब सबके दिल का हाल है, होनेवाला अब कमाल है! 'कल हो ना हो', अशी कॅप्शन पोस्टला देण्यात आली आहे. पोस्टर आल्यानंतर सर्व चाहत्यांनी आनंद व्यक्त केला होता. एका युजरने यावर कमेंटमध्ये लिहिले, शेवटी माझ्या आवडत्या चित्रपटांपैकी एक चित्रपट आता पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर येणार आहे. तर आणखी एकाने, कल हो ना हो हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित होणार हे ऐकून मला फार आनंद झाला. माझा आनंद शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे, अशी कमेंट केली होती. शाहरूख व प्रीतीच्या या चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे.

# वरुण धवनसोबत रोमान्स करणार पूजा



अभिनेत्री पूजा हेगडे ही डेव्हिड धवन यांच्या आगामी चित्रपटात वरुण धवनसोबत अभिनय करणार आहे. तर यापूर्वी श्रीलीला या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार होती. श्रीलीला 'गुंटूर कारम' आणि 'भगवंत केसरी' यासारख्या दाक्षिणात्य भारतीय चित्रपटांमधील भूमिकांसाठी आ-ळखली जाते. परंतु वरुण धवनच्या चित्रपटात आता श्रीलीला ऐवजी नायिका म्हणून पूजा हेगडेची निवड करण्यात आली आहे. या चित्रपटात अभिनेत्री मृणाल ठाकूर देखील दिसणार आहे. वरुण आणि त्याचे वडिल डेव्हिड धवन पुन्हा एकदा चित्रपटासाठी एकत्र आले आहेत. हा त्यांचा एकत्रितपणे काम केलेला चौथा चित्रपट ठरणरा आहे. वरुण धवन आणि डेव्हिड यांनी यापूर्वी २०१४ मध्ये 'मैं तेरा हीरो', २०१७ मध्ये 'जुडवा २' आणि २०२१ मध्ये 'कुली नंबर १'मध्ये एकत्र काम केले आहे. तर वरुण धवनच्या नव्या चित्रपटाचे नाव 'जवानी तो इश्क होना है' असे आहे. त्याचा हा चित्रपट पुढील वर्षी ऑक्टोबरमध्ये प्रदर्शित होणार असल्याचे समजते.

# टायगरच्या नव्या चित्रपटाची घोषणा



बॉलिवूडचा प्रसिद्ध स्टार अभिनेता टायगर श्रॉफच्या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. नुकताच तो 'सिंघम अगेन' चित्रपटात झळकला. यानंतर टायगर श्रॉफची सुपरहिट फ्रँचायझी असलेल्या बागी सिनेमाचा चौथा भाग अर्थात 'बागी ४' ची घोषणा करण्यात आली आहे. या सिनेमाचं पोस्टर देखील रिलीज करण्यात आले आहे. पोस्टरसोबतच त्याची रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. अभिनेता टायगर श्रॉफने त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर 'बागी ४'ची पहिली झलक दाखवली. त्याने या चित्रपटाचा फर्स्ट लूक शेअर केला आहे. ज्यामध्ये तो बाथरुममध्ये बसलेला दिसतो, त्याच्या हातात दारूची बाटली, तोंडात सिगारेट आणि हातात रक्ताने माखलेले हत्यार दिसत आहे. तर भिंतीवर रक्ताचे डाग पडलेले दिसतात. त्याच भिंतीवर 'बागी ४' ही अक्षरं दिसतात. बागी ४ हा या ॲक्शन थ्रिलर फ्रँचायझीच्या शेवटच्या तीन चित्रपटांपेक्षा वेगळा असणार आहे. टायगर श्रॉफने या पोस्टरद्वारे याचे संकेत दिले आहेत. 'बागी ४'चे हे पोस्टर पाहिल्यानंतर चाहत्यांची उत्कंठा खूपच वाढली असून ते रिलीजसाठी आतुर असल्याचे दिसत आहे. चित्रपटाच्या घोषणेसोबतच त्याची रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. साजिद नाडियादवाला यांनी पुन्हा एकदा 'बागी ४'च्या निर्मितीची धुरा सांभाळली आहे. हा सिनेमा ५ सप्टेंबर २०२५ ला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. या सिनेमात टायगर श्रॉफसोबत आणखी कोणते कलाकार झळकणार हे मात्र अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाही.